भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४९९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०७/२०१७

१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद .:—

दिनांक ०३/०५/२०१७ चे ११.३० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिचे आरोपी सोबत प्रेम संबध असल्याने यातील आरोपीने फिर्यादीचे मुलीला लग्नाचे आमिष दाखवुन फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३६३,३६६(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

२) क्षुल्लक कारणाने संगनमत करून काठीने डोक्यावर व तोंडावर तसेच बुक्कीने मारून दात पाडुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०७/०७/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील फिर्यादीची पत्नी सौ. शालु भागवत मेश्राम हिने 'भोपळयाचा वेल मोळकळुन तोडला' असे बोलत असता आरोपीतांनी संगनमत व भांडण करून फिर्यादीचे डोक्यावर आरोपी क्र. १ ने बासाचे काठीने मारून गंभिर दुखापत केली व आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादीचे पत्नीस ढकलढुल करून थापड बुक्यानी मारपीट केली व आरोपी क्र. ४ नी फिर्यादीचे तोंडावर बुक्कीने मारून खालचा १ दात पाडुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी रामदास पंढरी मेश्राम वय ६० वर्ष रा. कन्हेरी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

३) क्षुल्लक कारणावरुन डोक्याचे केस ओढुन डोळयाला नखाने ओरपडुन जबडयावर लात मारून मांडीचा चावा घेतल्याने तसेच गुडग्यावर चावा घेवुन जखमी करून शिवीगाळ व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०७/०७/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादीची पत्नी सौ. शालु उर्फ बबीता मेश्राम ही घरी हजर असता यातील आरोपीतांनी संगनमत करून आरोपी क्र. २ हिने दुधी भोपळा व वालाचे वेल कापले म्हणुन शिवीगाळ केली, म्हणुन फिर्यादीचे पत्नीने हटकले कि 'तु शिवीगाळ का करतेस' असे बोलली असता फिर्यादीचे पत्नीचे डोक्याचे केस ओढुन डावे डोळयाला नखाने ओरपडुन डावे जबडयावर लात मारून डावे मांडीचा चावा घेतल्याने व आरोपी क्र. १ याने फिर्यादीचा मुलगा साहील भागवत मश्राम वय २२ वर्ष याचे उजव्या गुडग्यावर चावा घेवुन जखमी केले व आरोपी क्र. ३ याने मारपीट व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) सरकारी कामात अडथडा आणुन सरकारी कर्तचाऱ्याला मारपीट करून सार्वजनिक मालमत्तेची (एसटी. बसची )नुकसानी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ८/०७/२०१७ चे ०७.१० वा. दर. यातील फिर्यादी त्याची बस क्र. एमएच ४० वाय ५३१३ ही चालवित बस स्थनकावर आनली असता त्याचे बसचे समोर २ युवक अचानक आल्याने त्यांना हटकले असता त्यावरून आरोपीतांनी बसचे मागील काच फोडुन सार्वजनिक मालमत्तेची नुकसानी केले व फिर्यादीचे कॉलर पकडुन मरपीट करून सरकारी कामात अडथडा निर्माण केल्याने फिर्यादी प्रशांत योगराज साठवणे वय ३२ वर्ष एस.टी. चालक बिल्ला नं. १३९५ एसटी आगार तिरोडा गोदींया यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५३ भादंवि. सहकलम ३ सार्वजनीक मालमत्तेचा नुकसान अधीनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा चोपकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) शेतात जाण्याच्या कारणावरून रस्ता अडवुन शेतात जाण्यास मनाई केल्याने व कायदेशीर आदेशाचा पालन न केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०६/०७/२०१७ चे १६.०० ते १६.३० वा. दर. यातील फिर्यादी दुधाराम बळीराम हटवार वय ७० वर्ष रा. सातोना याचा मुलगा नेहमी प्रमाणे पानदन रस्त्याचे ट्रक्टर घेवुन त्याचे शेतात जात असतांना यातील आरोपीने त्याचा रस्ता अडवुन शेतात जाण्यास मनाई करून पाुिन घेण्याची धमकी दिल्याने तसेच मा. तहसीलदार सा.यांनी दिलेल्या कायदेशीर आदेशाचा पालन न केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,५०६,१८८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा गिन्हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०८/०७/२०१७ चे १५.००ते १५.३० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील बोलेरो गाडी क्र. एमएच ३६ एफ ०३९३ ही आमरोडवर बसस्थानका समोर येणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. अडयाळ येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकर पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**६) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०८/०७/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील महीद्रा मॅक्स गाडी क्र. एमएच २९ एन ९१०३ ही आमरोडवर निलज फाटा समोर येणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. पवनी येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक ०८/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, वरठी, करडी, सिहोरा, साकोली व अडयाळ येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २१५ लिटर हातभट्टी दारु + ८२० किलो सडवा + साहित्य + १ स्कुटी कि.१,०५७४०/—रु. व ०१ लिटर ९८० मि.ली. विदेशी दारु किमती. २१४०/रु. असा एकुण किमती १,०७८८० /रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०८/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १८८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०६ तीन सिटर वाहनांवरती ३३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १४९ केसेस करण्यात आलेल्या आहेत

सफौ. आर. एस. बेहरा
नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२०८२०२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.